एस.सी.सी.३९/२०१५

निशाणी क्र. २०

<u>साक्षीदार क्र.२ चा दोषारोपपूर्वीचा पुरावा</u>

शपथेवर कथन करतो की,

नांव – सौ. छबुताई संपत डिगे

वय – ५५ वर्ष, व्यवसाय – घरकाम

राहणार – जवळवाडी तर्फ मेढा, ता.जावली, जि. सातारा

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास फियादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.जी.गोरे यांचेमार्फत सुरु**

१. मी आरोपींना ओळखते कारण ती माझ्या दिराची मुलं आहेत व आमच्याच गावातील आहेत. आमच्या घराची भिंत दिराच्या मुलांनी काळया पिवळया जीपने पाडली. तिचा नंबर मला सांगता येणार नाही. माझे शिक्षण झालेले नाही. भिंत पाडल्याच्या आवाजावरुन मी तिथे गेले असता त्यांनी इथं आलीस तर जीवं गाडीन, तुझं हातपाय तोडीन अशा शब्दांत शिवीगाळ केली. त्यांनी मला मारहाणदेखील केली. मी घाबरल्यामुळे पोलीस स्टेशनला गेले नाही. त्यांनी आमच्या घराचे अंदाजे दोन लाखांचे नुकसान केले. त्यांनी मला पोटात लाथाबुक्क्या मारल्या होत्या. त्यांनी माझ्या जागेत येवून मला मारहाण केली होती. झालेल्या घटनेची मी माझ्या पतीला माहिती दिली. त्यावेळी माझे पती मुंबईला असायचे. माझे पती मुंबईवरुन आल्यानंतर पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्याला शिक्षा करावी.

<u>सरतपास पूर्ण.</u>

**आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.ए.एस.देशमुख यांनी उलटतपास घेण्याचा अधिकार राखून ठेवला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

24/01/2023

आर.बी.खवले,

दि.२४.०१.२०२३

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**